**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत प्रशासकीय व तांत्रिक मंजुरीचे अधिकार प्रदान करण्याबाबत.**

छाननी समिती गठीत करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**नियोजन विभाग, (रोहयो)**

**शासन निर्णय क्रमांक- मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.४७/रोहयो-१०**

**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**

**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**

**दिनांक:- १७ जून, २०१६**

संदर्भ:- १) शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.४७/रोहयो-१०,दि. ८/६/२०१०
२) शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.४७/रोहयो-१०,दि. ३/८/२०११

**प्रस्तावना-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत उपरोक्त संदर्भ क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या दि. ३/८/२०११ च्या शासन निर्णयान्वये योजनेंतर्गतच्या प्रत्येकी एका कामासाठी रु. २५ लाखापर्यंतच्या कामांकरिता प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे अधिकार तहसिलदार आणि गटविकास अधिकारी यांना देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे रु. २५ लाखापेक्षा अधिक रक्कमेच्या कामांकरिता प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. सदर वित्तीय मान्यता फक्त महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामाकरिता लागू आहेत.

औरंगाबाद महसूल विभागामध्ये बऱ्याच ठिकाणी वैयक्तिक सिंचन विहिरी, रस्ते व इतर कामांना मोठया प्रमाणावर अनियमितता करुन मंजुरी दिल्याचे विभागीय आयुक्त औरगांबाद याच्या अहवालावरून शासनाच्या निदर्शनास आले आहे. विविध प्रकारच्या अनियमितता करुन मोठया प्रमाणावर प्रशासकीय मान्यता टाळण्यासाठी योजनेंतर्गतच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी विभागीय आयुक्त औरंगाबाद याच्या मागणी नुसार छाननी समिती गठीत करणे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार प्रायोगिक तत्वावर केवळ

औरंगाबाद विभागाकरिता प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्यापूर्वी नरेगाच्या कामांच्या प्रस्तावाच्या छाननीसाठी छाननी समिती गठीत करण्याच्या अनुषंगाने खालील निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

औरंगाबाद विभागातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गतच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यापुर्वी औरंगाबाद विभागातील संबंधित तालुक्याचे उप विभागीय अधिकारी, महसूल यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे छाननी समिती गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| अध्यक्ष | उप विभागीय अधिकारी, महसूल विभाग |
| सदस्य सचिव | तहसिलदार |
| सदस्य | गट विकास अधिकारी |
| सदस्य | तालुका कृषी अधिकारी, |
| सदस्य | उपअभियंता (बांधकाम) व उपअभियंता (सिंचन) जिल्हापरिषद |
| सदस्य | लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण,<br>वन परिक्षेत्र अधिकारी |
| सदस्य | इतर यंत्रणांचे तालुकास्तरीय अधिकारी |

**छाननी समितीची कार्ये:-**

१. सदर समिती प्रशासकीय मान्यतेसाठी छाननी समिती म्हणून कार्य करील.

२. मनरेगा कामांना कार्यक्रम अधिकारी (गट विकास अधिकारी/तहसिलदार) यांचेमार्फत प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी या समितीने प्रस्तावांची छाननी करुन प्रशासकीय मान्यता देण्यास सहमतीचे आदेश दयावेत. सदर आदेश प्राप्त झाल्यानंतरच संबंधित कार्यक्रम अधिकारी यांना प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित करता येतील.

३. सदर समिती प्रशासकीय मान्यतेसाठी कामांच्या यादीस सहमती दर्शविण्यापूर्वी अशा कामांची सर्वसाधारण छाननी करेल व शासनाच्या प्रचलित सूचनांनुसारच प्रशासकीय मान्यता होत असल्याचे तपासून घेईल.

सदर समितीचे गठन प्रायोगिक तत्वावर करण्यात येत असून तिचे गठन या आदेशाच्या दिनांकापासून पुढील नऊ महिन्यांकरिता करण्यात येत आहे. आदेशाच्या दिनांकापासूनच्या आठ

महिन्यानंतर या सर्व छाननी समितीच्या कामाच्या परिणामकारकतेबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी शासनास अहवाल सादर करावा. उपविभागीय अधिकारी यांच्या समितीने शिफारस केलेल्या यादीस प्रस्तावित कामांचे शेल्फ बनविताना अंतिम मान्यता मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने द्यावी. ग्रामपंचायतीकडील कामे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत / मगांराग्रारोहयो) हे प्रस्तावित करतील व यंत्रणांकडील कामे जिल्हाधिकारी यांचेकडे उपजिल्हाधिकारी (रोहयो) हे प्रस्तावित करतील. मुदती अखेर अहवाल प्राप्त झाल्यानंतर या प्रकारच्या छाननी समिती सुरु ठेवण्याबाबत व त्याची व्याप्ती राज्यभर करण्याच्या दृष्टीने आवश्यक निर्णय घेण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१६०६१८१३१७३३८४१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Leena Ashish Sankhe

Digitally signed by Leena Ashish Sankhe
DN: CN = Leena Ashish Sankhe, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = PLANNING
Date: 2016.06.24 12:53:00 +05'30'

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मुख्य सचिवांचे स्वीय सहायक,
५. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व विभागीय आयुक्त,
८. नरेगा आयुक्त, नागपूर
९. प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
१०. आयुक्त, (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
११. सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक
१२. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परीक्षा व लेखा)
१३. महालेखापाल १ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई, नागपूर

१४.महालेखापाल २ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र मुंबई/नागपूर,
१५.सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून),
१६.सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
१७.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१८. सर्व विशेष कार्यकारी अधिकारी तथा उप विकास आयुक्त (रोहयो),
१९. सर्व तहसिलदार,
२०. सर्व गट विकास अधिकारी,
२१. मुख्य अभियंता, ल.पा. (स्था.स्तर) पुणे,
२२. संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२३. सर्व उपसचिव, अवर सचिव, सहायक संचालक (लेखा), कक्ष अधिकारी, सांख्यिकीय अधिकारी (रोहयो प्रभाग),
२४.उप संचालक/रोहयो-९ यांच्याकडे संकेतस्थळावर अपलोड करण्याकरिता अग्रेषित.
२५.कक्ष अधिकारी, रोहयो-१,
२६.निवडनस्ती, रोहयो-१०.

D:\Desk 10 asst work\रोहयो १० GR छाननी समिती बाबत.docx